शुश्रुषा सिटीझन को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल लि. मुंबई या सहकारी संस्थेस विक्रोळी, मुंबई येथे परवडणाऱ्या दरात रुग्णालय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी भाग भांडवल उपलब्ध करुन देण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय, क्र: संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.२२/२२-स,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१९.

वाचा :- १) शासन निर्णय, समक्रमांक दिनांक १६.०२.२०१८ व दिनांक ०२.०८.२०१९.
२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे पत्र क्रमांक : सर्वसा/१५-सआ/२०८/२०१९, दिनांक ०७.०९.२०१९.

प्रस्तावना :-

शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल लि., मुंबई " ही संस्था सर्वसाधारण वैद्यकीय सेवेबरोबरच आपात्कालीन वैद्यकीय सेवा पुरवणारी सहकारी संस्था आहे. संस्थेच्या अहवालानुसार ही संस्था दरवर्षी जवळपास ६०,००० बाह्यरुग्णांना व ६,००० आंतररुग्णांना वैद्यकीय सेवा पुरवित आहे. सदर संस्था ही सन १९६९ पासून रुग्णालय सेवा देत आहे. दादर, मुंबई येथे स्थित या संस्थेस यापूर्वी शासनाने दादर येथिल रूग्णालय बांधण्याकरिता १९६६ ते १९८८ या दरम्यान सहकार विभागामार्फत रु.१५,००,०००/-इतके भाग भांडवल ५ हप्त्यात उपलब्ध करुन दिले होते. सदर भाग भांडवल संस्थेमार्फत शासनाला परत करण्यात आले आहे. आता सदर संस्थेने गरजू,गरीब रुग्णांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रु.२५ कोटी भागभांडवल उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे.त्यावर मा. मंत्रीमंडळाने शुश्रुषा सिटीझन को.ऑपरेटीव्ह हॉस्पीटल लि. मुंबई या सहकारी संस्थेला विक्रोळी, येथे प्रस्तावित प्रकल्पासाठी भागभांडवल देण्याच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी मंत्रीमंडळाचे सर्व अधिकार असलेली मा. मंत्री (सहकार) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्याचा निर्णय संदर्भ क्रमांक (१) येथिल दिनांक १६.२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेतला. त्यानुसार मा. मंत्रीमंडळ उप समितीची बैठक दि. १२.१२.२०१८ रोजी तसेच, दिनांक ७.८.२०१९ रोजी पुन्हा बैठक झाली. सदर बैठकीमध्ये मा.मंत्रीमंडळ उपसमितीने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला.

अ. सदर संस्था ही वैद्यकीय सेवा पुरविणारी सहकारी संस्था आहे. या संस्थेस शासनाने यापूर्वी दादर स्थित, मुंबई येथील रुग्णालयाच्या बांधकामाकरीता सन १९६६ ते १९८८ या दरम्यान शासनाने दिलेले रुपये १५ लाख इतके भागभांडवल संस्थेने सन २०१६ मध्ये शासनास परत केले. त्यामुळे संस्थेची अर्थिक स्थिती लक्षात घेता, या संस्थेला रु. २५ कोटी भागभांडवल उपलब्ध करुन दयावे, असा निर्णय मा.अध्यक्ष व सदस्य यांनी घेतला.

ब. संबंधीत संस्थेने दिनांक २०.६.२०१९ रोजीच्या पत्रानुसार आता रुपये २५ कोटी शासकीय अर्थसहाय्य का आवश्यक आहे याची तपशीलवार माहिती दिलेली नसल्यामुळे शुश्रुषा

सिटीझन्स को ऑपरेटिव्ह हॉस्पिटल लि. मुंबई या संस्थेकडून सविस्तर प्रस्ताव (म्हणजेच अर्थसहाय्याची आवश्यकता-बाबनिहाय, परतफेडीचे स्वरुप, परतफेडीचा कालावधी इ. तपशील) मागवून अर्थसहाय्य मागणीचा मूळ उद्देश बदलत असल्यामुळे मंत्रीमंडळासमोर प्रस्ताव सादर करावा, असा निर्णय घेण्यात आला.

मा. मंत्रीमंडळ उपसमितीच्या उपरोक्त निर्णयानुसार आता शुश्रुषा सिटीझन्स को ऑपरेटिव्ह हॉस्पिटल लि. मुंबई या संस्थेने दिनांक २९.८.२०१९ च्या पत्रान्वये सविस्तर प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावावर मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ०९.०९.२०१९ रोजीच्या बैठकीत चर्चा होवून मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सदर संस्थेस रु.२५ कोटी इतके भागभांडवल स्वरुपात (Redeemable Preference Shares) देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

शुश्रुषा सिटीझन को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल लि. मुंबई या सहकारी संस्थेस विक्रोळी, मुंबई येथे परवडणाऱ्या दरात रुग्णालय सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता रु. २५ कोटी इतके भागभांडवल स्वरुपात उपलब्ध करुन देण्याबाबत मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ०७.०८.२०१९ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार संस्थेने दिनांक २९.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावात खालीलप्रमाणे नमूद केलेल्या सुविधा गरीब व गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देण्यासाठी वरीलप्रमाणे अर्थसहाय्य भागभांडवल स्वरुपात (Redeemable Preference Shares) उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

Sr. No.	Facilities	Amount (Rs. in crores)
1	Offering emergency health care to save life, save limb and save function at door step	2.00
2	To offer state-of-the-art intensive care including monitoring of life support system of low cost	3.50
3	Care to road accident victims by giving primary and definitive care by creating special facilities.	1.00
4	Prevent maternity and child death during pregnancy and child birth by offering initial care by creating facilities like Neonatal and Paediatric Intensive Care Units.	1.50
5	Safety in diagnosis of difficult labour programs in patient with late pregnancy	3.00
6	To create facilities to meet disaster challenges during the epidemics, rains, accidents etc.	1.00
7	To create facilities for training of citizens by arranging camps for good health promotion and awareness.	0.40
8	Blindness is biggest challenge at present and its incident is getting more because of advancing age, incidents of diabetes and Hypertension. Special facilities to treat and cure blindness	3.00
9	To purchase equipment for diagnostic and creative remedies	2.00
10	To create special facilities for the elderly people for treatment of Cardiac, Neurology and Joint Disability programs.	2.60
11	Special theatre facilities for creating state-of-the-art equipment to treat cardiac, neuro and crippling arthritis problems by providing facilities for operations like cardiac and joint replacement surgeries	4.00
12	To create facilities for renal dialysis and in future Renal Transplantation	1.00
	Total	25.00

२. शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल लि., मुंबई या सहकारी संस्थेला त्यांचे दिनांक २९.८.२०१९ च्या प्रस्तावात नमूद सेवा-सुविधा रुग्णांना उपलब्ध करुन देण्यासाठी मा.मंत्री उपसमितीने घेतलेल्या निर्णयानुसार रु. २५ कोटी अर्थसहाय्य भागभांडवल स्वरुपात (Redeemable preference shares) उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, सदरहू भाग भांडवली उपलब्ध करुन देण्यासाठी "शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल लि., मुंबई या सहकारी संस्थेस भागभांडवल" या नवीन योजनेस मान्यता देणे तसेच, त्या अनुंषगिक नविन लेखाशिर्ष उघडण्यास मान्यता देण्यास खालील अटीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

(१) संस्थेस निधी उपलब्ध करुन देण्यापूर्वी संस्थेच्या पात्रता व योग्यतेविषयी सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय घेण्यात येतील. सार्वजनिक आरोग्य विभागाने संस्थेच्या पात्रता व योग्यतेविषयी सुयोग्य अभिप्राय दिल्यास आर्थिक वर्षे २०१९-२० करीता प्रथम रु.१०.०० कोटी वितरीत करण्यात येतील. तद्नंतर संस्थेची कामगिरी व २०१९-२० या वर्षात संस्थेकडून शासनास येणाऱ्या परतफेडीच्या रक्कमेची खातरजमा करुन पुढील तीन आर्थिक वर्षात प्रत्येकी रु.५.०० कोटी प्रमाणे रक्कम संस्थेस वितरीत करण्यात येईल. तसेच, शासकीय भाग भांडवल वेळापत्रकाप्रमाणे शासनास संस्थेने परतफेड केली नाही तर, राज्य शासनामार्फत पुढील निधी संस्थेस वितरीत केला जाणार नाही.

(२) शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल लि., मुंबई ही संस्था रुपये २५ कोटी भागभांडवल परत करण्यासाठी Capital Redemption Reserve Fund तयार करेल. तसेच, त्यामध्ये दरवर्षी नफ्याची परिगणना करण्यापूर्वी संस्थेने खालील रकान्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे ठराविक रक्कम शासनाकडे जमा करेल.

(रुपये कोटी मध्ये)

आर्थिक वर्षे	२०१९-२०	२०२०-२१	२०२१-२२	२०२२-२३	२०२३-२४	२०२४-२५	२०२५-२६	२०२६-२७	२०२७-२८	२०२८-२९
परतफेडीची रक्कम	१.००	१.००	१.५०	१.५०	२.५०	२.५०	३.५०	३.५०	४.००	४.००

(३) सदर इस्पितळाच्या संचालक मंडळावर महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था, अधिनियम १९६० च्या कलम ७३ अअअ नुसार शासन नियुक्त संचालकाची नेमणूक करण्यात येईल.

(४) या संस्थेतर्फे दारिद्रय रेषेखालील रुग्णांना विनामुल्य तसेच, दारिद्रय रेषेवरील गरीब रुग्णांना ५० टक्के दराने आंतर व बाहय रुग्णसेवा पुरविण्यात येईल.

(५) सदर इस्पितळाच्या निधीची काळजी घेण्याकरीता एका शासन नियुक्त अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येईल व त्याचा पगार सदर संस्था अदा करेल.

(६) सदर रु.२५ कोटी भागभांडवल शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल लि., मुंबई या संस्थेच्या संचालकाची वैयक्तीक हमी व बंधपत्र घेऊन देण्यात येईल.

(७) शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल लि.,मुंबई या संस्थेस नफा झाल्यास सदर Redeemable preferences shares नुसार त्यांनी शासनास लाभांश देणे आवश्यक राहील.

उपरोक्त अटींची पुर्तता केल्यानंतर आणि सहकार आयुक्तांकडून त्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर शुश्रुषा सिटीझन्स को-ऑपरेटीव्ह हॉस्पीटल लि., मुंबई या सहकारी संस्थेला प्रस्तावात नमूद सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रु. २५ कोटी अर्थसहाय्य भागभांडवल स्वरुपात (Redeemable preference shares) उपलब्ध देण्यास याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्रमांक ४००/२०१९/व्यय-२, दिनांक ११.०९.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. उक्त शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक **२०१९०९१११७४२३३६९०२** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Sudin Gaikwad

Digitally signed by Sudin Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co-Operation Marketing and Textiles Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=20315cd32e197cc2334676dbe1f09f90b2334eddf7e75d09609003b414273f73, serialNumber=8ff188a569f4a95d2f0ce8ca61e60d8aa5f51a1bf65b42dd49bb26d165941d9e, cn=Sudin Gaikwad
Date: 2019.09.11 20:15:24 +05'30'

(डॉ.सुदिन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री, गृह (शहरे), यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
५) मा.राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) मा.अपर मुख्य सचिव, वित्त यांचे वरिष्ठ स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) मा.प्रधान सचिव, सहकार यांचे वरिष्ठ स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९) मा.सचिव, वित्त विभाग/व्यय यांचे स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१०) मा.महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
११) मा.महालेखापपाल, लेखा व परीक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे
१३) अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय,मुंबई
१४) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१५) उप सचिव, वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई.
१६) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई,
१७) निवड नस्ती, कार्यासन-२२-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.